# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# राजकुमार मेंढपाळ बनतो

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

एके दिवशी मोशेने एक मिसरी मनुष्य एका इब्री गुलामाला मारत आहे असे पाहिले. मोशे जरी राजकुमाराप्रमाणे फारोच्या महालात लहानाचा मोठा झाला होता, व शिक्षण मिळाले होते तरी तो एक इब्री होता. मोशेने त्या गुलामाला मदत केली.



आजूबाजूला मला कोणी पाहात तर नाही ना, याची मोशेने खात्री करुन घेतली, आणि मोशेने त्या गुलामाच्या क्रूर मालकावर हल्ला केला. त्यांच्या या झगडण्यात मोशेने त्या मिसरी मनुष्याला मारुन टाकले. त्याने ताबडतोब त्या मनुष्याचे प्रेत पुरुन टाकले.



दुसऱ्या दिवशी दोन इब्री माणसांना एकमेकांसंगती भांडतांना मोशेने पाहिले. त्याने त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यातील एक मोशेला म्हणाला, "तूं त्या मिसऱ्याला जिवे मारले तसे मला देखिल मारु पाहतोस काय?" तेंव्हा मोशे घाबरला. कालच्या घटनेची सर्वांना माहिती झाली होती. फारोला देखिल माहित झाले होते. मोशेला तेथून पळून जावे लागले. तो मिद्यान नावाच्या देशात पळून गेला.



जाता–जाता मोशे एका विहिरीजवळ बसला. तेथील याजकाच्या सात मुली आपल्या बापाच्या शेरडांमेंढरांस पाजण्याकरिता पाणी डोणींत भरत होत्या.



इतर मेंढपाळ त्यांना तेथून एकाबाजूला हाकलून देण्याचा प्रयत्न करित होते. तेंव्हा मोशेने उठून त्या मुलींची मदत केली आणि त्यांचे संरक्षण केले.





त्या आपला बाप रगुवेल याच्याकडे आल्या तेंव्हा तो म्हणाला, "आज तुम्ही लवकर कशा आल्या?" कशा आल्या हे जेंव्हा त्या मुलिंनी स्पष्ट करुन सांगितले तेंव्हा तो म्हणाला, "त्या मनुष्याला येथे घेऊन या." माशे रगुवेल संगती राहिला, याला इथ्रो असे देखिल म्हणत. नंतर, मोशेने रगुवेलच्या मोठ्या मुलीशी लग्न केले.

मिसरांत, फारो राजा मरण पावला. देवाचे लोक, इब्री लोक अजून गुलामच होते. त्यांच्या दुःखात ते विव्हळत होते! देवाने मदत करावी म्हणून त्यांनी प्रार्थना केली!

देवाने त्यांच्या प्रार्थना ऐकल्या.



इब्री लोकांना गुलामगिरीतून सोडविण्यासाठी मोशेचा उपयोग करावा अशी देवाने योजना आखली, या योजनेविषयी मोशेला माहिती नव्हती. मोशे मिसर देश सोडून आल्यापासून आता ४० वर्षे झाले होते. तो रगुवेलच्या कळपांचा मेंढपाळ बनला होता. परंतू मिसरातील त्याच्या स्वतःच्या लोकांची त्याला खूप आठवण येत असावी.



एके दिवशी त्याच्याजवळ जळत असलेल्या झुडपाकडे त्याचे लक्ष गेले. परंतु अग्निने झुडुप मात्र भस्म होत नव्हते. हे असे का याविषयी शोध लावण्याचे मोशेने ठरविले.



मोशे त्या झुडपाकडे जात असतांना देवाने त्या झुडपातून मोशेला हाक मारली. "मोशे , मोशे!" तेंव्हा तो म्हणाला, "काय आज्ञा?" देव त्यास म्हणाला, "इकडे फार जवळ येऊ नको; तूं आपल्या पायांतले जोडे काढ, कारण ज्या जागीं तू उभा आहेस ती भूमि पवित्र आहे."



परमेश्वर देव आणखी म्हणाला, "माझ्या लोकांना मिसरांतून बाहेर काढून आणण्यासाठी मी तुला फारोकडे पाठविन." परंतु मोशे जाण्यास घाबरत होता.



तेंव्हा देवाने मोशेला त्याचे महान सामर्थ्य दाखवले. त्याने मोशेच्या हातातील काठीचा साप केला.



मोशेने त्या सापाच्या शेपटीला धरुन जेंव्हा उचलले तेंव्हा पुन्हा सापाची काठी बनली. देवाने दुसरे एक चिन्ह दिले.



देवाने मोशेला सांगितले की, "तुझा हात तुझ्या छातीवर ठेव." मोशेने तसे केले. तेंव्हा त्याचा हात कोडाने पांढरा झाला.



त्याने पुन्हा तसेच केले तेंव्हा त्याचा हात बरा झाला.



मोशे अजून आक्षेप घेत होता. तो म्हणाला, "मला चांगले बोलता येत नाही." देवाला आता राग आला. तो म्हणाला, "तुझा भाऊ अहरोन याचा मी उपयोग करीन, जे काही बोलायचे ते तू त्याला सांग."



मोशे इथ्रोकडे परतला, त्याने त्याचे सामान
घेतले आणि तो मिसर देशात जाण्यास निघाला.



मोशेचा भाऊ अहरोन याने रानात डोंगरावर जाऊन मोशेला भेटावे असे परमेश्वराने केले. इब्री लोकांना मिसऱ्यांच्या गुलामगिरीतून सोडविण्याच्या देवाच्या सर्व योजनेविषयी मोशेने अहरोनाला सांगितले. दोघांनी मिळून इब्री पुढाऱ्यांपर्यंत हि बातमी नेली. मोशेने जेंव्हा इब्री पुढाऱ्यांना चिन्हे दाखवले तेंव्हा देव आपल्याला मदत करेल हे त्यांना कळले. त्यांनी एकत्रित मिळून देवाची भक्ती केली.



धिटाईने, मोशे व अहरोन फारोकडे गेले. ते फारोला म्हणाले, "माझ्या लोकांना जाऊ द्या, असे परमेश्वर देव म्हणतो."



फारोने उत्तर दिले, "मी इस्राल लोकांना जाऊ देणार नाही." तो देवाचे ऐकणार नव्हता. फारोचे मन बदलण्यासाठी देवाला त्याच्या महान सामर्थ्याचा वापर करावा लागणार होता.



राजकुमार मेंढपाळ बनतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

निर्गम २-५

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16